# ब्रिटीश शिक्षणपद्धती व त्याचा भारतीय समाजावर पडलेला प्रभाव – एक ऐतिहासीक अध्ययन

**भोगेकर सचिन पत्रुजी,** संशोधक विद्यार्थी,इतिहास विभाग,रा. तु. म. नागपूर विद्यापीठ,नागपूर, महाराष्ट्र, भारत.

**सारांश** :ब्रिटीश सरकारने भारतात इंग्रजी शिक्षणपद्धती सुरू केली. इंग्रजी शिक्षणाचे भारतीय समाजावर चांगले व वाईट दोन्ही परिणाम दिसून येतात. इंग्रजांनी भारतात जी शिक्षण पद्धती सुरू केली, ती भारतीयांच्या कल्याण करणे हा उद्देश नसून एक साम्राज्यवादी विचारसरणी जनतेवर लादणे व अधिकाऱ्यांची कमी भरून काढण्यासाठी केलेली व्यवस्था होती. परंतु त्याचा परिणाम लोकांमध्ये जाणिव जागृती निर्माण होवून देशाबद्दल आपुलकी व राष्ट्रप्रेम निर्माण झाले. आणि त्यातूनच भारतीय राष्ट्रीय आंदोलनाला पार्श्वभूमी तयार झाली असे म्हणता येईल. इंग्रजी शिक्षणामुळे लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वाढूण समाजसुधारणा, धार्मिक सुधारणा, स्त्रि शिक्षण व हक्क यांची जाणीव झाली. यामधूनच देशामध्ये पुनरजागरणाला सुरूवात झाली. शिक्षणातून लोकांमध्ये स्वातंत्र्य, समता, न्याय यांची भावना वाढीस लागली.

**प्रस्तावना** : शिक्षण हे मनुष्याच्या सर्वांगीन विकासाचे महत्वाचे साधन आहे. मानवाला सुसंस्कृत बनविण्याचे कार्य शिक्षण करीत असते. शिक्षण हे मनुष्याला शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासासाठी महत्वाचे असून शिक्षणामुळे मानवाचे चारित्र्य व नैतिकता निर्माण होण्यास मदत होते. सुभाषीत रत्नसंदोह मध्ये शिक्षणाचे महत्व स्पष्ट करतांना म्हटले आहे की, ''शिक्षण हा मनुष्याचा तिसरा डोळा आहे. ज्यामुळे समस्त तत्वांचे मुळ समजण्यास मदत करते व सत्य कार्य करण्याची पद्धत सांगत असते.'' म्हणून मनुष्याच्या सर्वांगीन विकासासाठी शिक्षण महत्वाचे आहे.

भारतामध्ये प्राचीन कालखंडापासूनच शिक्षण पद्धती अस्तित्वात होती. प्राचीन कालखंडामध्ये स्त्री–पुरूष दोघांनाही शिक्षणाचा अधिकार होता. शिक्षणाला अत्यंत आदरणीय स्थान असून या कालखंडात गुरू–शिष्य परंपरा होती. आश्रमपद्धती व गुरूकूल पद्धतीद्वारे शिक्षण दिल्या जात. प्राचीन काळामध्ये स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार असून गार्गी, घोषा, अपाला यासारख्या विद्वान स्त्रिया होत्या. बौद्ध धर्माच्या उदयानंतर व त्याच्या विकासानंतर 'विहार' शिक्षणाचे केन्द्र बनली. शिक्षणाच्या प्रसारासाठी प्राचीन कालखंडामध्ये अनेक विद्यापीठे स्थापन करण्यात आली. त्यामध्ये नालंदा, तक्षशीला, वल्लभी, विक्रमशीला इ. विद्यापीठे नावाजलेली होती. यामध्ये शिक्षण घेण्यासाठी विदेशामधून विद्यार्थी येत असून या विद्यापीठामध्ये व्यापार, व्याकरण, तर्कशास्त्र, दर्शनशास्त्र, कारणमिमांसा, न्याय, साहित्य इ. शिक्षण दिल्या जात असे.

मध्ययुगीन कालखंडामध्ये तुर्कांचे आक्रमण झाली व दिल्लीमध्ये सुल्तानशाही अस्तित्वात आली. परंतु भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये फारसा बदल झालेला दिसून येत नाही. हिंदू शिक्षणपद्धतीमध्ये ब्राम्हण, बौद्ध भिक्षू, जैन मूनी यांच्याद्वारा शिक्षण देण्याचे कार्य सुरूच राहीले. ते शिक्षण मंदीर, पूजा घर, विहार, गाव किंवा मठ इत्यादी ठिकाणी होत. त्यामध्ये आध्यात्मिक व धार्मिक शिक्षण दिल्या जात असे. मुस्लीम धर्मामध्ये शिक्षणपद्धती अस्तित्वात असून राजघराण्यातील लोक काही प्रमाणात शिक्षण घेत. हे शिक्षण मस्जीद, मदरसा यामध्ये फारसी व अरबी भाषेमध्ये दिल्या जात असे.

मोघल सम्राटांनी शिक्षणव्यवस्थेत बदल करण्यासाठी प्रयत्न केले. सम्राट अकबराने शिक्षणासाठी प्रयत्न केले. त्यासंबंधी इतिहासकार टी. ए. सिकारी म्हणतात की, ''सम्राट अकबराच्या कालखंडामध्ये हिंदू व मुस्लीमांना एकाच शाळेमध्ये शिक्षण दिल्या जात. विविध धर्मातील विद्वानांना सहाय्यता व संरक्षण प्रदान केल्या गेले व शिक्षणासाठी शिक्षणसंस्था मोठ्या प्रमाणात खोलल्या गेल्या. औरंगजेबाच्या कालखंडात सुद्धा शिक्षण व्यक्तीगत व पारंपारीक आधारावर चालत होते.''[i] मध्यकालखंडामध्ये स्त्रियांना राजघराण्यातील स्त्रिया वगळता शिक्षणाचा फारसा अधिकार नव्हता.

ब्रिटीश शिक्षणपद्धतीला सुरूवात होण्याअगोदर भारतामध्ये विकसित शिक्षणपद्धती होती. प्राथमिक व विद्यालयीन शिक्षण अस्तित्वात होते. मोघल सत्तेच्या पतनानंतर भारतीय शिक्षणपद्धती लोप पावायला सुरूवात झाली. त्यामध्ये राजघराण्याचा झालेला लोप, ग्राम पंचायतीचा विनाश, देशी संस्थानिकांची समाप्ती, इंग्रजी शिक्षणाचा भारतात झालेला प्रसार, इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून मिळणारी नौकरी यामुळे देशी शिक्षण मागे पडले.

**इंग्रजी शिक्षण सुरू करण्यामागील परिस्थिती/कारणे व आवश्यकता** : प्लासीच्या लढाईने इंग्रजी सत्तेचा घातला गेलेला पाया बक्सारच्या लढाईने पूर्ण केला. काही कालखंडातच संपूर्ण देश ब्रिटीश सरकारच्या ताब्यात आला. इंग्रज भारतात आले तरी त्यांची संख्या फार कमी होती. भारतासारख्या विशाल देशाचा कारभार चालविण्यासाठी इंग्रजांकडे संख्या बळ अत्यंत कमी होते. इंग्रजांना भारतातील धर्म, येथील परिस्थिती, कामकाज यांची माहिती नव्हती. अशावेळी कामकाज करतांना अनेक अडचणी निर्माण होत. इंग्रजी शिकलेला भारतीय व्यक्ती असल्यास काम करणे सोपे होईल व निम्न स्तरावरील कामे कमी पगारामध्ये पूर्ण होईल आणि सरकारी उद्देश साध्य होईल. त्यासाठी इंग्रजी शिक्षण सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात आला. चार्ल्स ग्राड म्हणतो की, ''भारतावर शासन करीत असतांना भारतीयांना शिक्षीत न करणे एक महान अपराध आहे.''[ii]

**इसाईधर्मप्रचारक व मिशनरीजचे शिक्षण प्रसाराचे कार्य :** भारतामध्ये सुरूवातीला आधुनिक शिक्षणाला सुरूवात ईसाईधर्मप्रचारकांनी केलेली दिसून येते. त्यामध्ये पोर्तुगीज यांनी प्रथम शिक्षण कार्य सुरू केले. परंतु पोर्तुगीजांच्या पराभवानंतर हे कार्य मागे पडले. फ्रान्सीसी, डच धर्मप्रसारकांनी शिक्षण प्रसाराचे कार्य केले पण त्यांचा मुळ उद्‌देश शिक्षण नसून धर्मप्रसार करणे हाच होता. इंग्रज मिशनऱ्यानी प्राचीन भारतीय शिक्षणावर टीका करून इंग्रजी माध्यमावर आधारीत शिक्षणाद्वारे ख्रिश्चन विचार पसरविण्यातर जोर दिला. श्रीरामपूर येथील मिशनरी याकार्यामध्ये अग्रेसर होती. मुंबईमध्ये विल्सन कॉलेज, मद्रासमध्ये ख्रिश्चन कॉलेज सुरू करण्यात आले. आग्रामध्ये सेंट जॉन कॉलेज इ.स्थापन करण्यात आले.[iii]

**इंग्रज अधिकाऱ्यांचे सुरूवातीचे शिक्षण विषयक प्रयत्न :** ब्रिटीश सरकारने भारतात शिक्षणविषयक कार्य सुरू करण्याअगोदर काही इंग्रज अधिकाऱ्यांनी शिक्षणासाठी प्रयत्न केलेले दिसून येते. १७८१ मध्ये वॉरेन हेस्टींग्जने कलकत्याला 'मदरसा' स्थापन करून तिथे अरबी व फारसीच्या अभ्यासाला चालना दिली. १७९१ मध्ये डंकन याने बनारस येथे 'संस्कृत महाविद्यालय' सुरू करण्यात आले व त्यामध्ये धर्म, साहित्य व कायद्याचे शिक्षण देण्यात आले. काही ब्रिटीश अधिकाऱ्यांनी भारतीय साहित्याचा इंग्रजी भाषेत अनुवाद केला. विल्लीयम जोन्सने 'मनुस्मृतीचा' इंग्रजी अनुवाद केला. विल्सन याने भगवतगीतेचा अनुवाद केला. मॅक्समूल्लर याने 'वेदांचा' अनुवाद केला. एकूणच सुरूवातील काही इंग्रज अधिकाऱ्यांनी भारतात शिक्षण देण्यास सुरूवात केली. तर काहींनी भारतीय साहित्यामध्ये आवड निर्माण करून त्याचे इंग्रजीत भाषांतर केले.

**१८१३ चा चार्टर ॲक्ट :** १८१३ मध्ये इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये एक नविन चार्टर ॲक्ट पास करण्यात आला. या चार्टर ॲक्टने भारतामध्ये शिक्षणकार्य करण्यासाठी प्रत्येक वर्षाला एक लाख रूपये ''ब्रिटीश प्रदेशामध्ये साहित्याच्या पुनरूद्धार व सुधार तसेच वैज्ञानिक ज्ञानाला सुरूवात व वाढीसाठी खर्च करण्यात यावा.''[iv] १८१३ च्या चार्टर ॲक्टने काही प्रमाणात शिक्षणाच्या प्रसाराला सुरूवात झाली. परंतु पूर्णत: शिक्षणकार्य सुरू झाले नाही.

**शिक्षणाच्या माध्यमासंबंधी झालेला वाद :** भारतामध्ये १८१३ ला शिक्षणकार्य करण्यासाठी १ लाखाची तरतूद करण्यात आली. परंतु पुढे देशातील शिक्षणाचे माध्यम कुठले असावे यावरून फार मोठ्या प्रमाणात वाद निर्माण झाला. १८२३ मध्ये सर्वसाधारण शिक्षणासाठी एक समिती बनविण्यात आली व त्यामध्ये भारतीय शिक्षणाचे माध्यम निश्चित करण्यात येणार होते. भारतातील राजाराममोहन रॉय, राधाकान्त देव, डेविड हेअर इ. इंग्रजी माध्यमाचा पुरस्कार करीत होते. परंतु भारतीय शिक्षणाने माध्यम ठरविणाऱ्या समितीमध्ये दोन गट निर्माण झाले. एच. टी. पिन्सेपच्या नेतृत्वामध्ये प्राच्य विद्या मानणारा गट तर दूसरा आंग्लवादी विद्या मानणारा गट. त्यातूनच आंग्लवादी व प्राच्यवादी यांच्यात संघर्ष निर्माण झाला. त्यावर तोडगा काढण्यासाठी बेंटींगने हा निर्णय गव्हर्नर जनरलच्या कौन्सीलचा सदस्य मेकॉले यांच्याकडे सोपविला. मेकॉले याने इंग्रजी शिक्षणाची बाजु उचलून धरली. मेकॉलेने स्पष्ट केले की यानंतर कंपनी भारतातील शिक्षणासाठी फक्त इंग्रजी शिक्षा व पाश्चात्य विद्या यांच्या विकासासाठी पैसा खर्च करेल हे स्पष्ट झाले. इंग्रजी भाषेचे समर्थन करतांना मेकॉले म्हणतो की, ''भारतामध्ये असा वर्ग निर्माण होईल की जो रंगाने व शरीराने भारतीय असेल पण बुद्धीने इंग्रज असेल.''[v] अशा प्रकारे भारतामध्ये १८३५ मध्ये कायदा पास करून इंग्रजी शिक्षणाला सुरूवात करण्यात आली. इतिहासकार एल्फिन्स्टन म्हणतो की, ''भारतीयांनी इंग्रजी शिक्षा प्राप्त केल्यानंतर भारतीय समाज सहज इंग्रजी राज स्विकार करेल.''[vi]

**इंग्रज सरकारने नियुक्त केलेले शिक्षण आयोग :**

**वूडचा खलिता–१८५४ :** कंपनीने नुतनीकरण करण्यासाठी १८५३ मध्ये चार्टर ॲक्ट लागू करण्यात आला तेव्हा ब्रिटीश पार्लमेंटने भारतीय शिक्षणाचा आढावा घेण्यासाठी एक समिती नेमली. या समितीने अभ्यास करून आपला अहवाल डायरेक्टरांना देण्यात आला. याच अहवालाला वूडचा अहवाल/खलिता म्हटल्या जाते. या अहवालामध्ये शिक्षणाचा उद्‌देश युरोपीय कला, विज्ञान, दर्शनशास्त्र तसेच साहित्याचे एकीकरण करणे होते.

शिक्षणचे माध्यम म्हणून इंग्रजीला महत्व देण्यात आले तरी देशी भाषांना प्रोत्साहन देण्यात आले. खेड्यामध्ये देशी भाषेतील प्राथमिक शाळा तर जिल्हा स्तरावर इंग्रजी व देशी माध्यमाचे हायस्कूल व महाविद्यालय सुरू करण्यात यावी. लंडन विद्यापीठाचा आदर्श ठेवून भारतात कलकत्ता, मुंबई, मद्रास येथे विद्यापीठे सुरू करण्यात यावी. प्रत्येक विद्यापीठासाठी एक कुलगुरू, एक उपकुलगुरू तसेच सिनेटची व्यवस्था करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला. विविध विषयासाठी प्राध्यापक नियुक्त करण्यात यावे. खाजगी शिक्षण संस्थांना प्रोत्साहन देवून त्यांना अनुदान देण्याच्या पद्धतीचा अवलंब करावा. अनुदान देतांना त्या संस्थेची धार्मिक तटस्थता पाहील्या जात. हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची व्यवस्था करण्यात यावी. स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न करण्यात यावे. प्राध्यापकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात यावी.[vii] अशा प्रकारच्या शिफारसी करण्यात आल्या होत्या.वूडच्या अहवालाने भारतीय शिक्षणाचे झपाट्याने पाश्चीमात्यीकरण घडवून आणल्या गेले. शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात करण्यात आला.

**हण्टर आयोग (१८८२)** : गव्हर्णर जनरल लॉर्ड रिपन याने वूडच्या अहवालाचे भारतीय शिक्षणव्यवस्थेवरील प्रभावांचा अभ्यास करण्यासाठी व पुढील शिक्षणाच्या विकासासाठी उपाय सूचविण्यासाठी हण्टर यांच्या अध्यक्षतेखाली हा आयोग नेमण्यात आला. हण्टर आयोगाने प्राथमिक शिक्षणावर लक्ष्य केंद्रीत केले होते. प्राथमिक शिक्षणावरील खर्चा संदर्भात आयोगाने प्रस्ताव दिला की, नगरपालीका व जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणासाठी वेगळा कोष निर्माण करतील. शहरी व ग्रामीण प्राथमिक विद्यालयातील कोष वेगळे करण्यात यावे. माध्यमिक शिक्षणामध्ये देशी विद्यालयांना प्रोत्साहन देवून अनुदान प्रणाली सुरू करण्यात यावी व सरकारने या शिक्षणामधून स्वतःला मुक्त करावे. मुस्लीम शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यात यावे.[viii] स्त्री शिक्षणासाठी लक्ष्य देण्यात यावे. इत्यादी शिफारसी देण्यात आल्या.

**भारतीय विद्यापीठ कायदा (१९०४)** : लॉर्ड कर्झन अतिशय साम्राज्यवादी होता. कर्झनने भारतीय शिक्षणपद्धतीवर सरकारी नियंत्रण अत्यंत कडक करण्याचा पूर्ण प्रयत्न केला. त्यासाठी त्याने 'शिमला' येथे एक सम्मेलन बोलविले. कर्झनने रॅले आयोगाची शिफारस स्विकारत १९०४ चा विद्यापीठ कायदा पास केला. या कायद्यानुसार – विद्यापीठ उच्च शिक्षण विकास व संशोधन कार्यावर लक्ष केंद्रीत करेल. या कार्यासाठी योग्यता प्राप्त प्राध्यापक व प्राफेसरांची नियुक्ती करण्यात येईल. विद्यापीठातील सिनेटच्या सदस्यांची संख्या कमीत कमी ५० व जास्तीत जास्त १०० निश्चित करण्यात आली. कलकत्ता, मद्रास, मुंबई विद्यापीठातील निर्वाचीत सदस्य संख्या २० तर इतर दोनसाठी १५, १५ निश्चित करण्यात आली. विद्यापीठाचे अधिकार क्षेत्र निश्चित करण्यात आले. विद्यापीठाच्या अंतर्गत महाविद्यालयांना संलग्नीकरणासंबंधी अधिकार सरकारने आपल्याकडे घेतला. विद्यापीठाचे महाविद्यालयावरील नियंत्रण वाढविण्यात आले. विद्यापीठातील पाठ्यक्रम तसेच परिक्षा प्रणाली संबंधी कार्यवाहीसाठी एक समिती नेमण्यात आली. अशाप्रकारच्या शिफारसी विद्यापीठ कायद्याने लागू करण्यात आल्या. भारतीय विद्यापीठांना विश्वातील पूर्णतः सरकारी विद्यापीठाचे स्वरूप आले.''[ix].

**कर्झनचे शिक्षणविषयक इतर कार्य** : कर्झनने प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून देण्यावर भर दिला. माध्यमिक शिक्षणाचा विकास करण्यासाठी प्रशिक्षीत शिक्षक नेमण्यात यावे. प्रत्येक जिल्ह्यात एक राजकीय विद्यालय स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली. केंद्र सरकारला शिक्षणविषयक सल्ला देण्यासाठी 'केन्द्रीय शिक्षा विभाग' स्थापन करण्यात आला. कृषी विषयक शिक्षण देण्यासाठी प्रत्येक प्रांतामध्ये कृषी महाविद्यालये खोलण्यावर भर देण्यात आला. ऐतिहासिक इमारतीची पाहणी व सुरक्षेसाठी 'पुरातत्व विभाग' स्थापन करून 'प्राचीन स्मारक संरक्षण अधिनियम' पारीत करण्यात आला. विद्यार्थ्यांना विदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देण्याची तरतूद करण्यात आली. इ. कर्झनने शिक्षणविषयक सुधारणा केल्या.[x].

**सैंडलर आयोग** : भारत सरकारने कलकत्ता विद्यापीठातील समस्यांचा अभ्यास करण्यासाठी सैंडलर आयोग नेमण्यात आला. लॉर्ड चेम्सफोर्डच्या कालखंडामध्ये सैंडलर आयोग स्थापन करण्यात आला. या आयोगाने माध्यमिक शिक्षणापासून तर विद्यापीठ स्तरापर्यंतच्या समस्यांचा अभ्यास करून अहवाल सादर केला. त्यानुसार विद्यापीठातील इंटरमिडीएट श्रेणी ही माध्यमिक संस्थाकडे हस्तांतरीत करण्यात येईल. इंटरमिडीएट नंतर विद्यापीठामध्ये प्रवेश द्यावा. माध्यमिक तसेच इंटरमिडीएट शिक्षणाचे नियंत्रण करण्यासाठी 'माध्यमिक शिक्षा बोर्ड' निर्माण करण्यात यावे. भारत सरकारने कलकत्ता विद्यापीठावरील नियंत्रण समाप्त करून त्याचे हस्तांतरण बंगाल सरकारकडे देण्यात यावे. स्नातक शिक्षण हे इंटरमिडीएटच्या नंतर तीन वर्ष करण्यात यावे. स्त्री–शिक्षणाकडे जास्तीत जास्त लक्ष्य देवून त्याचे कार्य एका बोर्डाकडे दिल्या जावे. औद्योगिक तथा व्यावसायीक प्रशिक्षणाची समस्या सोडविण्यासाठी अनेक सुधारणांचा प्रस्ताव ठेवण्यात आला. शिक्षणाचे माध्यम हायस्कूल पर्यंत भारतीय भाषा व त्यानंतर इंग्रजी माध्यम ठेवण्यात आले. परीक्षा पद्धतीमध्ये सुधारणा करण्याची शिफारस करण्यात आली.

**सार्जेन्ट आयोग (१९४४)** : महायुद्ध संपल्यानंतर भारतातील शिक्षण विकासासाठी योजना तयार करण्याची जिम्मेदारी सर जॉन सार्जेन्ट यांच्याकडे देण्यात आली. सार्जेन्ट यांनी आपला अहवाल १९४४ मध्ये केन्द्रीय सल्लागार बोर्डाला सादर केला.या आयोगामध्ये पूर्व प्राथमिक विद्यालय हे ६ वर्षापर्यंतच्या बालकासाठी असावे. प्राथमिक शिक्षण हे ६ ते १४ वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांना निःशुल्क व अनिवार्य शिक्षण व्यवस्था असावी. हायस्कूलचे शिक्षण हे ११ ते १७ वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांना देण्यात यावे. त्यातील ४० टक्के विद्यार्थ्यांना निःशूल्क शिक्षण देण्यात यावे. योग्य विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची व्यवस्था करण्यात यावी. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा व इंग्रजी ही द्वितीय अनिवार्य विषयाच्या स्वरूपात असावी. विश्वविद्यालयामध्ये इन्टरमिडीएट समाप्त करून अकराव्या वर्गाला हायस्कूलशी जोडण्यात यावे. १२व्या वर्गाला महाविद्यालयाशी जोडल्या जावे. महाविद्यालयीन शिक्षण हे तीन वर्षासाठी असेल. या शिफारसी करण्यात आल्या.

**इंग्रजी शिक्षणाचे भारतावर झालेले परिणाम** : भारतामध्ये इंग्रजी शिक्षण सुरू झाल्याने काही चांगले तर काही वाईट परिणाम घडून आले. इंग्रजांनी भारतामध्ये जे शिक्षणव्यवस्था निर्माण केली ती भारताच्या फायद्यासाठी न करता इंग्रज

सरकारने आपल्या फायद्यासाठी केली. त्यामूळे इंग्रजी शिक्षणाचे विचार भारतीय समाजावर पडले. भारतात नंतर मात्र काही चांगले परिणाम सुद्धा दिसायला सुरूवात झाली.

इंग्रजी शिक्षणाने भारतातील राष्ट्रवादाला आळा घालण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी इंग्रज सरकारने पाश्चात्य संस्कृती व सभ्यता भारतीय लोकांवर लादण्याचा प्रयत्न केला. इंग्रज सरकारने भारतात असा वर्ग तयार केला जो रंगाने भारतीय असेल परंतु विचार, व्यवहार व वेष–भूषेने इंग्रज असेल. श्री. परांजपे म्हणतात की, ''इंग्रजी शिक्षणाचा मुख्य उद्देश भारतातील राष्ट्रीय विशेषता नष्ट करून येथील निवासिंना भारतीय असून सुद्धा आवड, व्यवहार व विचाराने इंग्रज बनविले.''[xi] एकुणच इंग्रजी शिक्षणाचा भारतीय लोकांच्या बुद्धीमत्तेवर परिणाम झाला.

इंग्रजी शिक्षणपद्धती भारतीय परिस्थितीला अनुसरून नसून ती इंग्लंडच्या पद्धतीवर आधारीत होती आणि ती भारतीयांवर लादण्यात आली. इंग्रज सरकारने शिक्षणाचे माध्यम इंग्रजी ठेवल्यामूळे सर्वसामान्य लोकांना समजनारे नव्हते. तसेच ही शिक्षणपद्धती विशिष्ठ वर्गापूरतीच मर्यादीत राहीली. जर मातृभाषेतून शिक्षण दिले असते तर ते लोकांपर्यंत पोहचविणे शक्य झाले असते. इंग्रज सरकारने इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून देशामध्ये सांप्रदायीकता वाढविण्याचे काम केले. खरे तर इंग्रजी शिक्षणाचा उद्देश देशातील लोकांचा सर्वांगीन विकास करणे नसून ब्रिटीश सरकारला पाठींबा देणारे, धोरणांचा पुरस्कार करणारे व कनिष्ठ कामकाज पाहणारे बाबू हवे होते. इंग्रज सरकारने भारतामध्ये सर्वांना समान शिक्षण न देता उच्च व मध्यमवर्गापर्यंतच सिमीत होते. सर्वसामान्य लोक शिक्षणापासून वंचीतच राहीले.

इंग्रजी शिक्षणाचे काही सकारात्मक परिणाम सुद्धा दिसून आलेत. इंग्रजी शिक्षणामुळे समाजाला आधुनिकीकरणाकडे नेण्याचा प्रयत्न केला. समाजातील अनिष्ठ प्रथा कमी करण्यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण झाली. इंग्रजी शिक्षणामूळे लोकांना जग, विकसीत देश तेथील समाज, विज्ञान यांची माहिती व्हायला सुरूवात झाली. त्याचा परिणाम देशामध्ये समाज सुधारणेसाठी लोकांना प्रेरणा मिळाली. त्यातूनच लोकांनी सती प्रथा बंदी, विधवा पुनर्विवाह, स्त्री–शिक्षण यांना पाठींबा द्यायला सुरूवात केली.

इंग्रजी शिक्षणामुळे राजकीय व राष्ट्रीय एकता वाढण्यास मदत झाली. पाश्चात्य साहित्याचा प्रभाव, मॅझेनी, गोरेव्हाल्टी इ. च्या साहित्याचा प्रभाव लोकांवर पडला व देशाप्रती प्रेम निर्माण व्हायला सुरूवात झाली. त्यामुळे देशात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले. इंग्रजी शिक्षणामुळे भारतीय भाषा व साहित्य यांचा विकास व्हायला सुरूवात झाली. इंग्रजी शिक्षणामुळे देशातील जातीव्यवस्था व धर्मवाद कमी व्हायला सुरूवात झाली. लोक एकत्र यायला सुरूवात झाली व लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण व्हायला सुरूवात झाली.

इंग्रजी शिक्षणामुळे भारतीय लोकांमध्ये एकी निर्माण व्हायला सुरूवात होवून देशात राष्ट्रीय आंदोलन व इंग्रज सरकारच्या शोषण विषयक नितीची लोकांना जाणिव व्हायला सुरूवात झाली. त्यामूळेच आपले हक्क, न्याय याची जाणिव होवून लोक एकत्र यायला लागले. या संदर्भात दादाभाई नौरोजी म्हणतात की, ''आम्हाला एक नविन प्रकाश मिळाला आहे. ज्यातून आम्ही शिकलो की राजा जनतेसाठी बनविला जातो, जनता राजासाठी नाही.''[xii] इंग्रजी शिक्षणाच्या परिणामाबाबत के. एस. पणिक्कर म्हणतात की, ''पाश्चात्य शिक्षण सुरू झाल्यामूळे भारतात एक गंभीर बौद्धिक परिवर्तन उदयाला आले.''[xiii] एकूणच अन्याया विरोधात पेटून उठण्याची भावना निर्माण झाली.

## संदर्भ ग्रंथसूची

[1] खन्ना, कै. (२००९), ''आधुनिक भारत का सामाजिक इतिहास'', अर्जून पब्लिशींग हाऊस. पृष्ठ क्र. १२४.
[1] बाला, सरोज (२०११), ''आधुनिक भारत का आर्थिक एवं सामाजिक इतिहास'', ओमेगा पब्लिकेशन्स, नई दिल्ली. पृष्ठ क्र. ११८.
[1] महाजन, वि. (१९६८), ''भारत १५२६ से आगे'', एस. चंद एण्ड कंम्पनी, नई दिल्ली. पृष्ठ क्र. ५२७.
[1] महाजन, वि., पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ५२४.
[1] खन्ना, कै. (२००९), पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १२८.
[1] मसूद, अहमद खॉ (१९९०), ''स्वतंत्रता आन्दोलन का इतिहास'', किताबघर, नई दिल्ली. पृष्ठ क्र. ४१.
[1] महाजन, वि. (१९६८), पूर्वोक्त. पृष्ठ क्र. ५२८.
[1] बाला, सरोजं (२०११), पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १३०.
[1] महाजन, वि. (१९६८), पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ५३२.
[1] बाला, सरोज (२०११), पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १२४.
[1] बाला, सरोज (२०११), पूर्वोक्त, पृष्ठ क्र. १३०.
[1] मसूद, अहमद खॉ (१९९०), पूर्वोक्त, पृष्ठ क्र. ४२.
[1] पण्णीकर, के. एस. (१९५४), ''ए सर्व्हे ऑफ इंडियन हिस्टरी'', बम्बई एशिया पब्लिशींग हाऊस, पृष्ठ क्र. २०५.